महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
दालन क्र.३४५,तिसरा मजला,ॲनेक्स इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दुरध्वनी क्र.०२२ २२०४५५६४ ई-मेल :vilasini.ghodke@nic.in

---

क्रमांक:सीएआर-२०२१/प्र.क्र.२९१/का.१० दिनांक :-१५ जून,२०२३

प्रति,

संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई.

विषय:-विधि व न्याय विभागातील निर्लेखित वाहन क्र. एम एच ०१ ए एन ७९७९ होंडा सिटी ची लिलावाने विक्री करण्यासंदर्भात निविदा मागविण्याकरीता प्रसिध्दीपत्रक शासनाच्या वेबसाईटला प्रसिध्द करणे.

महोदय

उपरोक्त विषयाबाबत आपणांस विनंती करण्यात येत आहे की, विधि व न्याय विभाग (खुद्द) कार्यालयातील, निर्लेखित केलेले वाहन क्र. एम एच ०१ ए एन ७९७९ होंडा सिटी ( १.५ व्हीएमटी पेट्रोल) ची विक्री करण्यासाठी इच्छुक निविदाधारकाकडून निविदा मागविण्यासाठी शासन संकेतस्थळ (intranet.maharashtra.gov.in) वरसोबतचे प्रसिध्दीपत्रक दि.२०.०६.२०२३ पुर्वी प्रसिध्द करण्यात यावे .

( वि.सु.घोडके )
कक्ष अधिकारी ,महाराष्ट्र शासन.

<u>निविदा प्रसिध्दीपत्रक</u>

विधि व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहन क्रमांक क्र. एम एच ०१ ए एन ७९७९ होंडा सिटी ( १.५ व्हीएमटी पेट्रोल ) हे दि. २४.०५.२०२२ रोजी निर्लेखित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर वाहन आहे त्या परिस्थितीत(जेथे आहे व जसे आहे)या तत्वावर विक्री करावयाचे आहे. त्यासाठी सदर वाहन खरेदी करु इच्छिणा-या व्यक्ती अथवा संस्था ज्या किंमतीला वाहन खरेदी करू इच्छितात त्या किमतीच्या मोहोरबंद निविदा इच्छुक व्यक्ती व संस्थाकडून मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विक्री करावयाच्या वाहनाचा तपशिल | |
|---|---|---|
| १ | वाहन निर्मिती दिनांक | ०१/२०११ |
| २ | रजिस्ट्रेशन क्रमांक व दिनांक | एम एच ०१ ए एन ७९७९, ११.०२.२०११ |
| ३ | चेसीस क्रमांक | MAKGM२५३ABN२०५७१६ |
| ४ | इंजिन क्रमांक | १५A७२२१२६२१ |
| ५ | उत्पादक कंपनी | होंडा मोटार कंपनी लिमिटेड |
| ६ | मॉडेल प्रकार | होंडा CITY १.५ MT,Petrol |
| ७ | वाहन इंजिन क्षमता | १४९७ |
| ८ | पुर्ण केलेली धावसंख्या | ८१,८८९ किमी |
| ९ | क्लास व कलर | एलएमवी (व्हाईट) |
| १० | सिलिंडर्सची संख्या | ४ |
| ११ | सिटिंग कॅपॅसिटी | ५ |
| १२ | अनलोडेड वेट | ११०० किलो |

<u>निविदा संदर्भातील अटी व शर्ती</u>

१. सदर वाहन ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत सिलबंद निविदा पध्दतीने विक्री करावयाची आहेत.

<u>२. सदर वाहन "जसे आहे तशा स्थितीत " नविन प्रशासकीय इमारत मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२,</u> येथे कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष पाहता येईल.

३. निविदा फॉर्म जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थाळावरुन डाउनलोड करुन घ्यावा.

४. सिलबंद निविदा दिनांक ३०.०६.२०२३ रोजी सायं. ०५ वा पर्यंत स्विकारण्यात येतील उशिरा प्राप्त झालेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

५. सिलबंद निविदा पाकिटावर "मोटार वाहन विक्रीसाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख करावा. सिलबंद निविदा पाकीट कक्ष अधिकारी,नोंदणी शाखा (का.१०), विधि व न्याय विभाग,३ रा माळा,विस्तार इमारत,रुम नं-३४५,मंत्रालय,मुंबई यांचे नाव पाठवावे

६. रुपये ५०००/- (रुपये पाच हजार फक्त) बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरावी, बयाणा रक्कम भरल्याशिवाय सिलबंद निविदा ग्राह्य धरण्यात अथवा स्वीकारण्यात येणार नाही.

७. डी. डी. "आहरण व संवितरण अधिकारी,विधि व न्याय विभाग" मंत्रालय,मुंबई-४०० ०३२ यांचे नावे काढावा.

८. सिलबंद निविदा दिनांक ०४.०७.२०२३ रोजी दुपारी ०३ वाजता अथवा कार्यालयाच्या सोयीने इतर दिवशी,५ वा मजला , मुख्य इमारत, दालन क्र.२५, सह सचिव (सेवा), विधि व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई

यांच्या दालनात उघडण्यात येतील. त्यावेळी सर्व इच्छुक खरेदीदारास उपस्थित राहता येईल.त्यासंदर्भात निविदाधारकांना दुरध्वनी/मोबाईल/ई-मेल/व्हाटस ऍप नंबरवरती कळविण्यात येईल.

९. सर्वात जास्त रकमेची निविदा सादर करणा-या निविदाधारकास सदर निविदा प्रक्रीयेमध्ये " यशस्वी निविदाधारक" म्हणून घोषित करण्यात येईल.

१०. यशस्वी निविदाधारकाने निविदा स्विकारल्याचे कळविण्यात आल्यापासून, त्याने १५ दिवसात वाहनाच्या किंमतीचा डिमांड ड्राफ्ट अदा करून वाहन स्वत:च्या नावावर हस्तांतरित करण्याची कार्यवाही करावी.

११. यशस्वी निविदाधारकास नियम व अटींची पुर्तता करु शकत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निविदा रद्द करून त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१२. आरटीओ कार्यालयात वाहनाच्या मालकीच्या हस्तांतरासाठी येणारा खर्च (ट्रान्सफर चार्जेस) (आर सी बुक,टिसी बुक,वाहतुक,रोड टॅक्स,इंन्सुरन्स इ) यशस्वी निविदा धारकास करावा लागेल.

१३. वाहन खरेदी केल्यानंतर वाहनावरील महाराष्ट्र शासनाचे स्टिकर्स / लोगो इत्यादी माहिती काढून टाकावी लागेल.

१४. निविदा उघडल्यानंतर योग्य किंमत न आल्यास, विक्री करण्याचा अथवा विक्री नाकारण्याचे सर्व अधिकार वाहन विक्री समिती , विधि व न्याय विभाग यांचेच राहतील.अपात्र निविदेबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५. निवडलेल्या निविदाधारकांव्यतिरिक्त अन्य निविदा भरणा-या व्यक्ती/संस्था यांच्या अनामत रकमेचा डिमांड ड्राफ्ट परत करण्यात येईल.

१६. निविदाधारकाने दरपत्रकासोबत आधारकार्ड/ पॅनकार्ड छायांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.

१७. ज्या निविदाधारकांचे दरपत्रक मंजूर करण्यात येईल त्याला वाहनाच्या वाहतूकीचा, हमालीचा व सामान हाताळणीचा खर्च स्वतः करावा लागेल.

१८. निविदाधारकाने निविदा अर्जात लागू असेल त्याप्रमाणे स्वत:चे/कंपनीचे/संस्थेचे संपुर्ण नाव,पत्ता,पीनकोड नंबर,दुरध्वनी/मोबाईल/व्हाट्स ऍप/ई मेल देणे आवश्यक आहे.

१९. वाहनाच्या हस्तांतरणासाठी आवश्यक असणारे "ना हरकत प्रमाणपत्र" आर.टी.ओ. ऑफिसला सादर करण्यासाठी विधि व न्याय विभागाकडून दिले जाईल.

| अ.क्र. | निविदा प्रक्रीया तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्याचा प्रस्तावित दिनांक | २०.०६.२०२३ |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी | ३०.०६.२०२३ |
| ३ | निविदा अंतिमरित्या सादर करण्याचा दिनांक व वेळ | ३०.०६.२०२३ सायं ५.०० वाजेपर्यंत |
| ४ | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | ०४.०७.२०२३ दु.३.०० |
| ५ | निविदा उघडण्याचे ठिकाण | ५ वा मजला,मुख्य इमारत,दालन क्र.२५,विधि व न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई |

# अर्जाचा नमुना

निविदा भरणा-याचे संपुर्ण नाव
व संपुर्ण पत्ता-
दुरध्वनी क्रमांक-
मोबाईल क्रमांक-
email पत्ता-
whats app.नंबर-
दिनांक:-

प्रति,
सह सचिव(सेवा),
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२

विषय :-विधि व न्याय विभागातील निर्लेखित केलेल्या शासकीय वाहन क्र.MH०१-AN ७९७९ ची लिलावाद्वारे करावयाच्या विक्रीसंदर्भात निविदा अर्ज

संदर्भ:-विधि व न्याय विभागाची दि.२०.०६.२०२३ ची निविदा सुचना

महोदय,

| अ.क्र. | बाब | भरावयाचा तपशील |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे संपुर्ण नाव | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता,मोबाईल क्रमांक,ई मेल/व्हाट्स ऍप क्रमांक:- | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपुर्ण पत्ता व दुरध्वनी व ई मेल पत्ता | |
| ४ | जी.एस.टी क्रमांक असल्यास (कंपनी/संस्था) | |
| ५ | निविदेसोबत रु.५०००/- अनामत रकमेचा डिमांड ड्राफ्ट(बँकेचे नाव IFSC code,शाखा) | |

| | | |
|---|---|---|
| ६ | निविदा सादर करावयाचा दिनांक | |

विधि व न्याय विभागाची निविदा सूचना क्रमांक : वाहन- ---/प्र.क्र. -- / का---. दिनांक ---- अन्वये विधि व न्याय विभागातील निर्लेखित केलेले वाहन क्र एम एच ०१ ए एन ७९७९ होंडा सिटी (१.५ व्हीएमटी पेट्रोल) ची विक्री करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक ------ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली निविदा नमुना व त्यासोबत जोडलेल्या अटी, शर्ती व सूचनांनुसार मी/ वाहन क्र. "एम एच ०१ ए एन ७९७९ होंडा सिटी (१.५ व्हीएमटी पेट्रोल) हे रुपये /- ----------------(अक्षरी रुपये ---------------------फक्त) इतक्या किंमतीला विकत घेऊ इच्छितो.सदर वाहनाच्या आर.टी.ओ. मार्फत होणा-या हस्तांतरणासाठी येणारा सर्व खर्च करण्यास मी तयार आहे. मी/विधि व न्याय विभागामार्फत विक्री करण्यात यावयाच्या वाहनाची पाहणी केलेली आहे. या प्रक्रियेकरीता विहित केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत.सोबत अनामत रक्कम रु.५००० चा डिमांड ड्राफ्ट मी जोडलेला आहे.

आपला.

निविदा सादर करणाऱ्याचे/संस्थेचे नाव / शिक्का